# प्रकरण पहिले

## इस्लामी कायद्याचा उगम व विकास

ढ

अ. इस्लामी कायद्याचा उगम व स्वरूप :

भारतातील मुस्लीम व्यक्तिगत कायदयाची सुरुवात आणि स्वरूप जाणून घेण्यासाठी इस्लामी कायदयाचे स्वरूप आणि निर्मिती यांची थोडक्यात माहिती करून घेणे आवश्यक आहे. कारण व्यक्तिगत कायदा हा इस्लामी कायदा आणि न्यायशास्त्रातून विकसित झालेला आहे. इस्लामच्या तत्वाप्रमाणे इस्लामी कायदा आणि न्यायशास्त्र यांचा उगम पवित्र कुराणातूनच झालेला असून, " पवित्र कुराणांतून निर्माण झालेल्या कायदयाचे स्वरूप सर्व समावेशक असून, त्यात सर्व प्रकारची धार्मिक, कर्तव्ये मुस्लीम माणसाचे भौतिक जीवन नियंत्रित करणारे सर्व प्रकारचे, " अल्लाहचे आदेश" आणि धार्मिक उपासना सण-समारंभ आणि राजकीय व वैधानिक नियम यांचा समावेश होतो.[1]

या सर्व समावेशक इस्लामी कायदयाला " शरा" किंवा " शारिया" किंवा " शारियत " म्हटले जाते. आणि या इस्लामी कायदयाचा उगम ज्या प्रमाणात " कुराण शारिफ " मधील श्लोकांचे ( सुरे ) अवतरण होत गेले, त्या प्रमाणात त्यांची निर्मिती होत गेली आहे. असे असले तरी पैंगबर साहेबाच्या आयुष्यातील शेवटच्या दहा वर्षात ( हिजरी सन १ ते १०) इस्लामी कायदयाला आकार प्राप्त झाल्याचे दिसते. त्या काळात मक्का, मदिना या शहरावर पैगंबर साहेबांनी सत्ता स्थापन केलेली होती. आणि त्यांना कायदे प्रशासन यांची गरज भासत होती. इस्लामी श्रध्देनुसार, दैवी आदेशाप्रमाणे पैगंबर साहेबांनी कायदे करण्याकडे आपले लक्ष दिले. " पवित्र कुराणातील वेगवेगळ्या श्लोकामधून देण्यात आलेले नियम आणि त्या नियमानुसार पैंगबर साहेबानी लावलेला अर्थ आणि त्यांची शिकवण यातून इस्लामी कायदयाचा विकास झालेला आहे.

यानंतरच्या दुस-या कालखंडात ज्याला " खुलफा-ए-रशिदून " या नावाने ओळखला जातो. त्या काळात हिजरी सन १० ते ४० च्या सुमारास पैगंबर साहेबांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळालेले पहिले चार खलीफा त्यात येतात. त्यापैकी खलिफा उमर आणि खलीफा हजरत अली हे विशेष करुन, धर्म आणि कायदा या वरील मोठे तज्ञ होते. त्यांनी पैगंबर साहेबाच्या उपदेश आणि शिकवणूकीच्या मूळ आशयाला धक्का न लावता, पवित्र कुराणांतील आदेश आणि पैगंबर साहेबाची वचने यांचा अन्वय लावून त्यांना व्यवहारात लागू करण्याचे काम त्यांनी केले.[२]

त्यानंतरच्या काळात हिजरी सन ४० ते हिजरी चौथ्या शतकापर्यंतच्या काळात पैगंबर साहेब किंवा त्यांचे खास सहकारी यापैकी कोणाचेच मार्गदर्शन उपलब्ध नव्हते. परिणामी त्या त्या काळातील धर्म पंडितानी पैगंबर साहेबांची वचने मोठया कष्टाने संकलित केली आणि त्या वचनांच्या आधाराने कायदयाचा विस्तार केला या प्रयत्नामधूनच इस्लामी "फिकाह" म्हणजे इस्लामचा कायदा किंवा कायदेशास्त्र विकसित झालेले आहे.

या " फिकाह " मध्ये नैतिक-धार्मिक समारंभात्मक दिवाणी आणि नियंत्रणात्मक, असे सर्व प्रकारचे कायदे समाविष्ट असतात. फिकाह चा सर्व साधारण अर्थ, ज्ञान किंवा विज्ञान असा होतो. परंतू " इस्लामी कायदेशास्त्र " या साठी तो पारिभाषिक शब्द म्हणून वापरला जाण्याची पध्दती प्रस्थापित झालेला आहे. विशेष म्हणजे या फिकाह ची विविध प्रकारची उत्पत्ती साधने आहे आणि म्हणून प्रत्येक मुस्लीम व्यक्तीने काळजीपूर्वक समजावून घेवून, त्यांचा अर्थ लावून, व्यवहारात अंमलबजावणी करणे आवश्यक असते त्या साठी पवित्र-कुराण आणि हदिस (पैगंबर वचने ) यांचा योग्य अन्वय लावणे आवश्यक असते. परिणामी यासाठी " इज्मा" आणि "कियास " म्हणजे मानवी विवेकबुध्दीवर आधारलेल्या अर्थाचे शास्त्र कियास म्हणजे " अनुमान " ही दोन शास्त्रे विकसित झाली. त्यांच्या आधारानेच पवित्र कुराण व हदिस यांचे अन्वय लावणारे

वेगवेगळे ग्रंथ वेगवेगळ्या विद्वांनानी लिहले .[3]

या प्रक्रियेमुळे मधून इस्लामी कायदयाचा विकास झालेला दिसून येतो. कारण ज्या प्रमाणात इस्लामी राज्य, ज्या वेगाने वाढले, त्या प्रमाणात त्या त्या प्रदेशातील काझींना अधिकृत मार्गदर्शन आपल्या कडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांनी आपली विवेकबुध्दी आणि निगमन शक्ती " कियास " यांचा वापर करून विविध प्रदेशातील विविध काळातील इस्लामी कायदे तयार केले. त्या इस्लामी कायदयांचा तात्विक आधार पवित्र कुराण व हदिस हेच होते. यामधून वेगवेगळ्या विद्वान धर्म-पंडितानी उदा: इमाम बुखारी, इमाम मुस्लीम, इमाम अबु दाऊद, इमाम तिरमिझी वैगरे हदिसचे संकलन करणारे ग्रंथ तयार केले.

चौथे खलिफा हजरतअली यांच्या मृत्यूनंतर पैंगबर साहेबांच्या अनुयायात २ गट पडून सुन्नी, शिया, असे दोन पंथ निर्माण झाले. शिया पंथाच्या अनुयायांनी देखील आपले हदिस चे संकलन केले.

अशाप्रकारे पवित्र कुराण आणि हदिस ची वेगवेगळी संकलने यांचा आधार घेवून आणि इज्मा आणि कियास यांचा वापर करून, इस्लामी कायदेशास्त्र विकसित करण्यात आले. विशेषत: सून्नी संप्रदायात हनफी, मलिकि शाफई आणि हबंली असे ४ कायदयाचे संप्रदाय निर्माण झाले या संप्रदायाची नावे, संबंधित इमामाच्या म्हणजे न्याय पंडिताच्या नावावरून रूढ झालेली आहेत या मधील इमाम शाफई या श्रेष्ठ कायदेपंडिताने इस्लामी कायदे शास्त्राचे चार आधार मांडले. ते सर्वांनीच स्वीकारलेले आहेत. हे आधारस्तंभ म्हणजे पवित्र-कुराण, सुन्ना, म्हणजे पैगंबर वचने आणि शिकवण, इज्मा व कियास हे होत.[४]

प्रख्यात कायदेपंडित मुल्ला यांनी देखील आपल्या " प्रिन्सिपल्स ऑफ मॉहोमेडन लॉ" या सुप्रसिध्द कायदे विषयक ग्रंथात वरील चार आधार स्तंभ म्हणून मांडलेले आहेत.

१. पवित्र कुराण हे इस्लामी कायदे शास्त्राचे आणि जीवन पध्दतीचे तात्विक आणि व्यावहारिक आधारस्तंभ मानले जाते. इस्लामी

श्रध्देनुसार देवदूत जिब्राईल यांनी अल्लाहचे जे आदेश साक्षात्कार रूपाने पैगंबर साहेबापर्यंत पोहचविले, त्या आदेशाचे, संकलन म्हणजे पवित्र कुराण " असून त्यातील सर्व श्लोक, आणि वचने प्रत्यक्ष अल्हाचेच आहेत. असे मानले जाते आणि म्हणून त्यात कोणताही प्रकारचा बदल करणे म्हणजे पाखंड आणि महापातक असे मानले जाते. पवित्र कुराणात एकूण जवळ जवळ सहाहजार श्लोक असून त्यापैकी २०० श्लोक वैधानिक तत्वांच्या स्वरूपातील आहेत आणि त्यात ही साधारणपणे ८० श्लोक व्यक्तिगत जीवनाचे नियमन करण्यासंबंधीचे आहेत. उदा- विवाह, तलाक, वारसा हक्क वैगरे, विशेष म्हणजे कुराणातील हे श्लोक तत्वाच्या स्वरूपात असून त्यांची सविस्तर आणि व्यवहारिक मांडणी केलेली नाही. ही सर्व कुराणातील वचने पैगंबर साहेबाच्या जीवनातील वेगवेगळया आदेशांच्या स्वरूपात अवतरलेली होती. त्यांचे संकलन त्यांच्या महानिर्वाणानंतर केले जावून त्यांचा पवित्र ग्रंथ तयार झालेला आहे.

२. सुन्ना किंवा हदिस :

सुन्ना किंवा हदिस हा इस्लामी कायदेशास्त्राचा दुसरा प्रमुख आधार आहे. सुन्ना म्हणजे पैगंबर साहेबानी घालून दिलेले नियम व वचेन होय. पैगंबर साहेबांच्या २४ वर्षांच्या अवतार कार्यात जे नियम त्यांनी तयार केले आणि त्या संबंधी जी वचने मांडली त्या सर्वांचा समावेश "हदिस " किंवा " सुन्ना " मध्ये होतो. वर म्हटल्याप्रमाणे वेगवेगळया धर्म पंडितानी, उदा. इमाम बुखारी किंवा इमाम मुस्लीम, या सारख्या अनेकांना या हदिस वचनांचे संकलित ग्रंथ तयार केले. अनेक संधी-साधूनी ? त्यात काही काल्पनिक वचने देखील घुसडून देण्याचे प्रयत्न केले. म्हणून कोणते पैगंबर वचन खरे आणि कोणते खोटे हे ठरविण्याचे नियम आणि शास्त्र देखील तत्कालिन धर्म पंडितानी तयार केले.

3. इज्मा :

इज्मा म्हणजे मोठमोठया धर्म पंडितानी आपल्या विवेक बुध्दीनुसार कुराण आणि हदिस यांच्या तत्वाचे अर्थ लावून तयार केलेले परिस्थितीजन्य

कायदे होत. या अन्वय लावण्याच्या पध्दतीला " इज्तिहाद " असे म्हणतात. अशा प्रकारची इज्तिहादची पध्दती इस्लामधील ९ व्या शतकापर्यंत इमाम गझाली यांच्या काळा पर्यंत चालू होतील. इमाम गझाली यांनी तत्कालीन सामाजिक व राजकिय परिस्थितीच्या दडपणाखालील या इज्तिहादचे दरवाजे बंद करुन टाकले.

४. कियास :

कियास म्हणजे तर्कशास्त्र म्हणजे निगमन पध्दतीच्या आधारे आपल्या समोरील परिस्थिती किंवा घटना यांच्या संदर्भात, इस्लामी कायदयाचा लावलेला अर्थ होय. यामध्ये मानवी बुध्दी तर्क, विवेक, यांचा आधार असतो. म्हणजेच इस्लामी कायदेशास्त्र ते पूर्णपणे केवळ अल्लाहच्याच शब्दाने बनलेले नसून त्यात कायदे पंडिताचे विवेक, एकवाक्यता आणि बुध्दी यांचाही अंश मिसळलेला दिसून येतो. तसेच न्यायमूर्ती हिदायतुल्ला यांनी धर्म पंडित म्हणजे मुक्ती आणि इमाम यांचे फतवे, यांचा ही उल्लेख आधार, म्हणून केलेला असून औरंगजेबाच्या काळात " संकलित " केल्या गेलेल्या " फतवा-ए-आलमगिरी" या ग्रंथाचे नाव नमूद केले आहे. अशा प्रकारे वरील चार आधार इस्लामी कायदेशास्त्राचे आधार म्हणून मानले गेलेले असून त्यांच्यामधून इस्लामी कायदेशास्त्र आणि न्यायशास्त्र विकसित झालेले आहे. "[५]

ब. इस्लामी कायद्याच्या विकासाचे टप्पे, कालखंड आणि जबाबदार धर्मपंडित.

इस्लामच्या धर्म पंडित आणि परंपरावादी अभ्यासकांचे एक प्रचलित मत असे आहे. कि " फिकाह " म्हणजे इस्लामचे कायदेशास्त्र आणि

न्यायशास्त्र पूर्णपणे " शरा" म्हणजेच " शरियत " वर आधारित आहे. आणि त्यात कोणताही बदल किंवा काल सापेक्ष लावलेला अर्थ, त्यांना मान्य नसतो. गेल्या १४00 वर्षापासून इस्लामचा कायदा, जसा या तसा चालत आलेला आहे. असे म्हटले जाते. परंतु इस्लामी कायदेशास्त्र आणि न्यायशास्त्र यांच्या विकासाचे टप्पे कालखंड आणि त्यासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्ती, यांचा मागोवा घेतल्यास वस्तुस्थिती वेगळी असल्याचे दिसून येते. वास्तविक जोसेफ शॉक्ट यांनी म्हटल्याप्रमाणे वेगवेगळ्या राजकिय आणि प्रशासकीय परिस्थिती मधून इस्लामचे कायदेशास्त्र उदयास आले आणि विकसित झाले.[६] पहिले चार पवित्र खलिफा, उम्मयाद् आणि अब्बासिद साम्राज्य, तुर्कस्थान, आणि मुघल साम्राज्ये यांच्या कालखंडात इस्लामी कायदयाची वेगवेगळी तत्वे निर्माण झाली. आणि प्रस्थापित झाली. प्रा. शॉक्ट यांनी म्हटल्याप्रमाणे इस्लामी कायदयाचे स्वरूप पवित्र असले तरी इस्लामी कायदा हा पूर्णपणे धर्म किंवा साक्षात्कार सारखा प्रक्रियेवर आधारलेला नाही. तर त्यांत विवेक आणि तर्कशास्त्र/देखील आहे.[७] विशेष म्हणजे अनेक तटस्थ अभ्यासकांच्या मते, पारंपरिक धर्मशास्त्रात देखील कार्यकारणभाव पध्दती आणि अनुमान पध्दती यांच्या मोठया प्रमाणावर वापर असल्याचे दिसून येते. वास्तविक इस्लामी कायदा हे कायदेपंडितानी निर्माण केलेल्या कायदयाचे उत्तम उदाहरण मानले जाते. ( ज्यूरिस्ट लॉ ) इस्लामच्या पहिल्या शतकात पैंगबरसाहेब पहिले चार पवित्र खलिफा, यांनी केलेली मांडणी दिसून येते. नंतरचा कालखंड उम्मयाद साम्राज्याचा येतो. अर्थात उम्मयाद राजाचे सर्व लक्ष मुख्यत्वे करून धर्म आणि धार्मिक कायदयाच्या प्रथापने पेक्षा राजकीय प्रशासनाकडे जास्त असल्याचे दिसून येते. वास्तविक इस्लामी कायदयाच्या विकासाची सुरुवात याच कालखंडात झाली. उम्मयाद राजांनी नेमलेल्या काझीनी आपल्या निर्णयांच्या रूपाने त्यांची सुरुवात केली. सुरुवातीला हे काझी अनुमानाचा वापर करून आणि " रॉय " म्हणजे पारखून घेतलेले मत यांचा वापर.........

करून आणि महत्वाचे म्हणजे त्यांच्या भागातील रुढी आणि परंपरा यांचा ही आधार घेवून नियम तयार करताना आणि न्याय देताना दिसून येतात. [८]

नंतरचा कालखंड हा अब्बासी घराण्याचा येतो. या कालखंडात इस्लामी कायदेशास्त्र वाढताना दिसून येते. कारण अब्बासीद काळात परिस्थिती आणि इस्लामचे प्रदेश यात मोठे परिवर्तन होत गेले. अरब समाजाला नवीन कायदे पध्दतीची गरज फार मोठया प्रमाणावर गरज भासू लागली अब्बासीद राजांनी इस्लामीकरणाचे धोरण फार मोठया प्रमाणावर स्विकारले. परिणामी आदरणीय मानल्या गेलेल्या धर्मगुरूंनी मांडलेले इस्लामी कायदयाचे तत्वे आणि नियम हेच इस्लामी कायदेशास्त्राचा प्रमुख आधार स्तंभ असले पाहिले हा विचार अधिकृत म्हणून त्यांनी प्रस्थापित केला. [९] परिणामी काझी हा शारियत चा तज्ञच असला पाहिजे हा नियम, प्रस्थापित झाला. आणि अशाप्रकारे पवित्र कुराण आणि सुन्ना यांचा शाब्दबर हुकूम अर्थ लावणारे काझी आणि धर्मगुरू यांना असाधारण महत्व प्राप्त झाले. पण त्यांचबरोबर वेगवेगळया धर्मपंडितानी आप-आपल्या ज्ञानानुसार अर्थ लावून, कायदे शास्त्राची तयार केलेले अनेक ग्रंथ या दोन्ही काळात लिहले गेल्याचे दिसून येते. ब-याच वेळेला त्यांच्या प्रतिपादनात परस्परविरोध आणि विसंगती ही आढळून येत होत्या. एका अर्थाने या विसंगती टाळण्यासाठी कायदे शास्त्राचे संहितीकरण ( कोडीफिकेशन ) करण्याची गरज निर्माण झालेली होती. अब्बासीद कालखंडात संहिती करणाचे काही अर्धवट प्रयत्न झालेले दिसून येतात. " इब्न-अल-मुकाफा" नावांच्या अब्बासीद राजांच्या मंत्र्याने हिजरी सन १३९ मध्ये अशा प्रकारचा प्रस्ताव मांडलेला होता आणि इस्लामी कायदेशास्त्र आणि न्यायशास्त्र यात दिसून येणारी परस्पर विरोधी मते विसंगती यावर टिका केली. होती. अशा-प्रकारे इस्लामी कायदेशास्त्राच्या वैचारिक विकासाला वेगवेगळया इस्लामी

राज्यातील काझी आणि मुफ्ती यांनी फार मोठया प्रमाणावर हातभार लावल्याचे स्पष्ट होते. हे मुफ्ती धर्मशास्त्रातील तज्ञ असत. आणि वेगवेगळया धार्मिक आणि कायदयाच्या कुटप्रश्नाबद्दल फतवे काढीत असत. म्हणून या फतव्यांना देखील महत्व प्राप्त झाल्याचे दिसते.

अशाप्रकारे इस्लामच्या इतिहासातील सुरुवातीच्या कालखंडातील इस्लामी कायदेशास्त्र तयार होत असतानाची परिस्थिती आणि एकूणप्रत्येक कालखंडातील गुणविशेष यांचा विचार केल्या नंतर, त्या कालखंडात होवून गेलेल्यासुन्नी पंथातील चार प्रमुख धर्मपंडित ( ज्यांचा उल्लेख यापूर्वी केला गेला आहे ) यांच्याविचार पध्दती बद्दल अगदी थोडक्यात माहिती घेणे उद्बोधक ठरेल हे चार धर्मपंडित म्हणजे इमाम, अबुहनीफा, इमाममलिक आणि इमाम हंबल हे होत. यांच्याही कायदेविषयक दृष्टीकोनात आणि मांडणी मध्ये फरक दिसून येतो. इमाम अबुहनिफा यांचा जन्म हिजरीसन ८० मध्ये " बसरा " या शहरात झालेला होता. त्यांची कर्मभूमी "कुफा" हे शहर होते. त्यांनी त्याकाळातील गरजेनुसार इस्लामी कायदयाचे संहितीकरण केले महत्वाचे म्हणजे त्यांच्या तर्क आणि अनुमान पध्दतीचा ( कियास ) मुख्य आधारे पवित्र कुराण होता. आणि जोपर्यंत " हदीस " च्या (पैगंबर वचनाच्या) खरेपणा बद्दल त्यांची खात्री होत नसे. तो पर्यंत ते त्यांचा स्विकार करीत नसत. त्यांच्या काळात सर्व पैगंबर वचनांचे शास्त्रशुध्द संकलन झालेले नव्हते. त्यामुळे त्यांनी फार कमी वचनांचा वापर केलेला दिसून येतो. महत्वाचे म्हणजे कायदा निर्माण करण्यांच्या प्रक्रियेत " कियास" प्रक्रियेला त्यांच्यामुळे महत्व प्राप्त झाले तसेच समन्याय बुध्दीच्या तत्वाला ( इक्विटी ) देखील त्यांच्या मुळेच महत्व प्राप्त झाले.

दुसरे धर्म पंडित इमाम मलिक यांचा जन्म मदिना शहरात हिजरी सन ९३ मध्ये झालेला होता. अभ्यासकांच्या मते त्यांनी कायदेशास्त्राची मांडणी करीत असताना मदिना शहरात उपलब्ध असलेली जी पैगंबर वचने ( हदीस ) होती, फक्त त्यांचाच वापर त्यांनी केलेला होता. त्यामुळे त्यांनी केलेले संहितीकरण वेगळ्या प्रकारचे झालेले दिसते.

तिसरे धर्मपंडित इमाम शाफई यांचा जन्म हि. स. १५० मध्ये झालेला होता. त्यांचे शिक्षण " मक्का" शहरात झाले. परंतु सर्व कारकीर्द इजिप्त मध्ये गेली. कायदेविषयक निर्णय देण्याबाबत ते फार काटेकोर होते. " पवित्र कुराण " संबंधीचा त्यांचा अभ्यास अतिशय सखोल होता. आणि हदिसच्या अभ्यास करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. असे अभ्यासकानी म्हटलेले आहे. अनेक अभ्यासकानी त्यांनी केलेल्या इस्लामी कायदयाच्या संहितीकरणाबद्दल गौरवपूर्ण स्तुती केली आहे.

चौथे धर्म पंडित इमाम हंबल यांचा जन्म बगदाद मध्ये हि. स. १६४ मध्ये झालेला होता. " मसनद " हा त्यांचा सुप्रसिध्द ग्रंथ होय. त्यांचा विशेष म्हणजे, त्यांनी "कियास" म्हणजे अनुमानपध्दती याला अत्यंत कमी महत्व दिले आणि आपल्या मांडणी साठी पूर्णपणे "हदीस" वरच अवलंबून राहिले. अभ्यासकांच्या मते त्यांनी कायदयाचा अर्थ लावताना अत्यंत संदिग्ध असलेल्या "हदीस"चाही वापर केला. - 10 .

यावरून एक गोष्ट लक्षात येते की इस्लामचे कायदेशास्त्र पवित्र कुराणातील शब्दबर हुकूम नाही. तर त्यामध्ये परिस्थिती सापेक्ष अन्वय, पंडिताची विवेकबुध्दी, आणि आकलनाच्या प्रेरणा, यांचा देखील फार मोठा भाग आहे. इस्लामी कायदेशास्त्रात " इज्तिहाद", म्हणजे विवेक बुध्दीनुसार लावलेला अन्वय आणि " कियास " म्हणजे अनुमानपध्दती यांचा ही वापर मोठया प्रमाणात आहे. महत्वाचे म्हणजे

ही गोष्ट खरी आहे की " पवित्र कुराणाने तर्क आणि विवेकबुध्दी पेक्षा साक्षात्काराला जास्तमहत्व दिले आहे. परंतु त्याच बरोबर साक्षात्काराने प्राप्त झालेले सत्य, तर्क आणि विवेकबुध्दीच्या आधारे पारखून घ्या, असे ही म्हटले आहे आणि पवित्रकुराणात अनुयायांना सतत विचार करण्याचे आवाहान केले आहे.[११] आणखीन एक गोष्ट म्हणजे विवेक बुध्दीने कायदेशास्त्राबद्दलचे निर्णय देण्याची पध्दती वरील चार धर्मपंडितामुळे सुरु झाली. असे जे म्हटले जाते ते बरोबर नाही. "मो " महमद अली यांनी दर्शविलेल्या प्रमाणे खुद्द पैगंबर साहेबांनी देखील या पध्दतीचा वापर केलेला होता.[१२]

अलीकडच्या काळात इस्लामी अभ्यासकानी केलेल्या संशोधनानुसार ज्यांचा " अपरिवर्तनीय " म्हणून उल्लेख केला जातो. तो " शारिया" किंवा " शारियत " ही संकल्पना खुद्द पैगंबर साहेबांच्या काळात देखील अविकसित स्वरुपातच होती. विशेष म्हणजे "पवित्रकुराणा" मध्ये देखील तोच शब्द वेगळ्या प्रकाराने आलेला आहे. कुराणातील श्लोक आहे " आम्ही तुम्हांला धर्माच्या बाबतीत "मार्ग ( शारियतीन ) दाखविला त्याचे अनुसरण किंवा ( ४५:१८) अभ्यासकांच्या मते पवित्र कुराणात " शारा" किंवा " शारिया" हा शब्द संपूर्ण कायदेशास्त्राचा गाभा"या अर्थाने वापरला गेलेला नाही.[१३]

अशा प्रकारे इस्लामी कायदेशास्त्राचे स्वरुप हे विविधतापूर्ण आहे. त्यांचा तात्त्विक आणि वैचारिक आधार, पवित्र कुराण आणि हदीस आहे त्याचबरोबर त्यात " इज्मा" म्हणजे इज्जिहाद " आणि कियास यांचा ही वाटा मोठा आहे. त्याचप्रमाणे इस्लामी कायदेशास्त्राच्या मांडणीत आणि विकासात, मानवी बुध्दी, परिस्थिती आणि धर्म पंडिताचे आकलन आणि प्रेरणा यांनी देखील हातभार लावलेला आहे. विशेष म्हणजे पवित्रकुराण सोडून बाकीच्या सर्व उत्पत्ती साधनांसंबंधीचे उलट-सुलट प्रवाह आहेत. त्यांच्यात विरोध, तफावत, आणि मतभिन्नता आहे. आणखीन एक महत्वाची गोष्ट म्हणजे "शिया" पंथीयाचे देखील वेगळे आणि स्वायत्त इस्लामी

धर्मशास्त्र आहे. अशा प्रकारचा विरोध आणि विसंगती निर्माण झाल्यामुळे नंतरच्या काळात इज्तिहादला बंदी घालण्याचे आदेश दिले गेले होते. तरी इज्तिहाद चा वापर नंतरच्या काळातील बादशाहा व त्यांनी पदरी बाळगलेल्या धर्मगुरुंनी आप-आपल्या सोयीनूसार केलेला आहे. त्यामुळे इस्लामी कायदेशास्त्र कुराण शब्द बर हुकम आहे, असे केले जाणारे प्रतिपादन परिस्थिती-सापेक्ष नाही कारण पवित्रकुराण हे जरी " अल्लाह " चा शब्द असले तरी इस्लामी कायदेशास्त्र हे अल्लाहचे चिरंतन आणि अपरिवर्तनीय शब्द आहे, असे म्हणणे कठीण आहे. इस्लामीक कायदयातून इस्लामी व्यक्तिगत कायदा ज्या प्रकारे विकसित झाला, त्यावरुन ही गोष्ट सिध्द होवू शकते.

## क. इस्लामी कायदेशास्त्रातील कौटुंबिक कायदयाचा विकास :

वरीलप्रकारे इस्लामी कायदेशास्त्राच्या विकासाचा आणि स्वरुपाचा थोडक्यात विचार केल्या नंतर इस्लामच्या कायदेशास्त्रात व्यक्ती जीवन संबंधी विकसित झालेल्या कायदयाचा विचार करणे उद्बोधक ठरेल, मुळात, व्यक्ती जीवनासंबंधी असलेल्या कायदयाला इस्लामी शरिया मध्ये किंवा " फिकाह" मध्ये व्यक्तिगत कायदा म्हणजे " पर्सनल लॉ" असा शब्दप्रयोग कोठे ही येत नाही. हा शब्द प्रयोग ब्रिटिश राज्यकर्तानी, त्यांच्या राज्य-कारभारांचे धोरण म्हणून प्रचारात आणला. इस्लामी फिकाह मध्ये असा शब्दप्रयोग केला जात नाही. इस्लामी फिकाह " मध्ये व्यक्ती आणि अल्लाह यांच्या मधील कर्तव्याच्या कायदयांना " इबादतेच " नियम, असे म्हणतात, आणि व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, व्यवहार या बद्दलच्या नियमांना " मामलात " असे म्हणतात या बद्दलच्या सर्व प्रकारच्या नियम आणि कायदयावर "अल्लाह"च्या आदेशाचे बंधन असते. परंतु इस्लामी फिकाह मध्ये व्यक्तीचा विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, वैगरे, कायदयासाठी स्वतंत्र शब्दप्रयोग नाही.

इस्लामच्या तत्वानुसार समाजरचना करीत असताना पैगंबर साहेबांनी व्यक्ती जीवनासंबंधीचे जे नियम अल्लाहच्या आदेशानुसार तयार केले. ते सर्वस्वी नवे किंवा अरब समाजाला पूर्णपणे अपरिचित नव्हते. तत्कालीन अरबी समाजात वेगवेगळया गुन्हया संबंधीचे जे , नियम होते, किंवा प्रथा होते, तसेच व्यक्ती जीवनासंबंधीचे देखील जे नियम किंवा प्रथा होत्या, त्यांचे स्वरूप अप्रगत आणि मोठया प्रमाणात रानटी स्वरूपाचे होते काही ठिकाणी अशा प्रथा किंवा नियम सर्वस्वी काढून टाकणे ही शक्य नव्हते. आणि म्हणून या संबधीचे कायदे तयार करीत असतांना पैंगबर साहेबांनी प्रेषित-तत्वा बरोबरच समाज सुधारकाचा दृष्टीकोन स्विकारण्याचे दिसून येते आणि म्हणून त्यांनी अरब समाजात असणा-या प्रथा, नियम, संस्कार दुरुस्त करून त्यात सुधारणा करून कायदे तयार केले आणि काही ठिकाणी नवे नियम तयार केले.

उदा: व्यक्ती जीवनातील काही नियमांचा उल्लेख करणे योग्य ठरेल. लग्न किंवा विवाहाचेच उदाहरण घेण्यास हरकत नाही. तत्कालीन अरब समाजात लग्न किंवा विवाहाच्या अनेक प्रकारचे प्रथा आणि नियम होते. प्रत्येक टोळीचे वेगळे नियम असत. विवाहाला तात्पुरत्या कराराचे स्वरूप दिले जात असत. पैंगबर साहेबांनी या सर्वांचे एकत्रिकरण करून विवाहाला अल्लाहाच्या आदेशावर आधारित "पवित्र कराराचे " स्वरूप दिले. आणि हा करार सर्वांवर बंधनकारक केला. त्या काळात लग्नात वधू मूल्यदेण्याची प्रथा अरब टोळयात होती. ते बदलून त्यांनी " मेहेर " संकल्पना आणली ( मेहेर संबंधी विवेचन इस्लाम ने स्त्रियांना दिलेल्या हक्कांची चर्चा करताना सविस्तर पणे दिले जाईल )

फार मोठया प्रमाणावर असा एक समज प्रसारित करण्यात आलेला आहे. कि इस्लामनेच बहुपत्नीत्वांचा कायदा केला आहे. परंतू इस्लाम पूर्व मध्य आशियातील सर्व देशावर बहुपत्नीत्वाचीच प्रथा अस्तीत्वात होती. इतकेच नव्हे, तर युरोपिय देशात भारतासारख्या देशात देखील सर्व जाती-जमातीत बहुपत्नीत्वांची प्रथा सर्रास होती.

अरब टोळी समाजात तर बहुपत्नीत्वा संबंधीचे कसलेही नियम किंवा बंधने नव्हती. पैंगबरसाहेबानी या बहुपत्नीत्वाच्या प्रथेवर मर्यादा घालण्याचे प्रयत्न केले. विशेष म्हणजे, सय्यद अमीर अली, यांच्या शब्दांत, " पैंगबर साहेबांनी तत्कालीन बहुपत्नीत्वांच्या प्रथेला कायदयाचे स्वरूप दिले किंवा " अरब समाजातील बहुपत्नीत्वांची प्रथा स्विकारली" अशी युरोपीयन अभ्यासकांनी केलेली मांडणी चुकीची आहे. कारण त्यांनी बहुपत्नीत्वांच्या प्रथेचा कायदा केलेला नाही. उलट, अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत आणि अनाथ स्त्रियांच्या संरक्षणासाठी चार पर्यंत बायका करण्याची सवलत दिली. आणि " पवित्र कुराणातील " अनेक ठिकाणी येणारे श्लोक आणि पैंगबर वचने यामधून बहुपत्नीत्वाच्या प्रथेवर कडक टिकाच केलेली दिसून येते. म्हणजेच मुळ इस्लाम मध्ये बहुपत्नीत्वांचा कायदा नसून अपवादात्मक सवलत आहे. या संबंधीचे सविस्तर विवेचन देखील पुढील प्रकरणात करण्यात येईल. "[१४]

तलाक किंवा घटस्फोटाच्या बाबतीत देखील तशीच परिस्थिती आहे. तत्कालिन अरब समाजातील पुरूषावर घटस्फोटांच्या बाबतीत कसलीही बंधने नव्हती. त्यामुळे वाटेल त्या प्रमाणात व वाटेल त्या प्रकारे घटस्फोट घेतले जात होते. म्हणून पैंगबर साहेबांनी त्यावर मर्यादा घातल्या आणि घटस्फोटाच्या अटी, पध्दती आणि लवाद या संबंधीचे नियम केले.[१५]

मुळात पैंगबर साहेबांच्या काळात कुटुंबासंबंधीचे कायदे व नियम अश्या प्रकारे तयार केले गेले परंतू पैंगबर साहेबांच्या मृत्यूनंतर, ज्या प्रमाणात इस्लामचा प्रसार वेगवेगळया प्रदेशात आणि संस्कृतीच्या वेगवेगळया पातळयावर असलेल्या लोक समुहात होत गेला. त्या प्रमाणात "कुराण प्रणित " कौटुंबिक कायदयामध्ये मोठया प्रमाणात बदल केले गेले.

एक महत्वाची गोष्ट म्हणजे, पवित्र कुराणातील सर्व श्लोक परिस्थिती आणि प्रसंग यावर आधारित असल्याने कुटुंबा संबंधीचे कायदे सूत्रांच्या स्वरूपात दिसून येतात. म्हणून घटनांचा भिन्न-भिन्न अर्थ लावून त्यांचा विपर्यास ही करता येतो. त्याच बरोबर पितृसत्ताक टोळी समाजाचे रूपांतर, ज्या प्रमाणात मध्ययुगीन सरंजाम शाहीत, आणि राजेशाहीत होत गेले, तसे सरंजामदार, उमराव, सुलतान, धर्मगुरू वैगेरे सत्ताधारी अभिजन वर्गांचा उदय इस्लामी समाजात झाला, ततसे या लोकांनी " पवित्र कुराणाचे अर्थ त्यांना सोयीस्कर होतील अशा प्रकारे लावले गेले त्या शिवाय इराणी, तुर्की, इजिप्ती, सिरियन वैगरे संस्कृती असणा-या प्रदेशात जेव्हा इस्लामचा प्रसार झाला, तेथील सामाजिक मूल्ये स्त्री-पुरूष संबंध याचेच रूपांतर कुराणाचे सोयीस्कर अर्थ केले गेले. इस्लामी धर्म पंडितानी आप-आपल्या काळातील मूल्ये व सामाजिक परंपरा यानांच कुराणातील वचने सोयीस्कर रित्या फिरवून अधिमान्यता मिळवून देण्याचा, तेच नियम कुराणातील नियम म्हणून मांडण्याचा प्रकार सुरूवाती पासून केला. कुराणातील कायदयांचे वेगवेगळे अर्थ वेगवेगळया काळात आणि वेगवेगळ्या प्रदेशात अस्तित्वात असल्याचे चित्र मध्ययुगात दिसते. याबाबतीत बहुपत्नीत्वाचे उदाहरण देण्यासारखे आहे. " पवित्र कुराणामध्ये बहुपत्नीत्वासंबंधी फक्त एकच आयब श्लोक आहे. तो पुढीलप्रमाणे " तुम्हाला जर भीती वाटत असेल कि अनाथाशी तुम्ही न्यायाने वागू शकणार नाही तर तुम्हाला योग्य वाटणा-या स्त्रीयांशी लग्न करा तुम्ही अश्या२, ३ किंवा ४ बायकांशी लग्न करा. तुम्ही त्यांना योग्य न्याय देवू शकत नसाल तर एकशी लग्न करा ".[१६] या श्लोकावरून एक गोष्ट स्पष्ट होते की पवित्र कुराणात चार बायका करण्याचा कायदा केलेला नाही. तर त्यामध्ये काही विशिष्ट परिस्थिती आणि महत्वाच्या अटी सहित चारपर्यंत बायका करण्याची "अपवादात्मक देण्यात आलेली सवलत आहे.

प्रख्यात इस्लामी पंडित मौ. महमद अली आणि मौ. आझाद यांच्या मते युध्दातील अनाथ स्त्रिया आणि मुले यांचा प्रश्न सोडविण्यासाठी हा श्लोक देण्यात आलेला आहे.[१७] परंतू नंतरच्या राजेशाहीच्या कालखंडात वेगवेगळया देशातील राजे, सरंजामदार यांनी आपल्या विलासी जीवनाला धर्माचा आधार मिळविण्यासाठी वरील श्लोकाचा आपणास हवा तसा अर्थ धर्मगुरूकडून लावून घेतला. उदा. २ x ३ x ४ स्वदया बायका करण्याचा अन्वय देखील धर्मगुरूनी लावलेला दिसून येतो.[१८] यावरून इस्लामप्रणित कौटुंबिक कायदयात कसे फेरबदल वेग-वेगळया वेळी केले गेले, हे दिसून येते. त्यात ही भारता सारख्या देशात जेव्हा तुर्क आणि मुघल यांची सत्ता स्थापन झाली, त्या काळापर्यंत इस्लाम मध्ये बंदिस्तपणा आलेला होता. आणि " इज्तिहाद"चे दरवाजे बंद करण्यात आलेले होते.[१९] विशेषत: समरकंद आणि बुखारा ही मध्य आशियातील शहरे इस्लामी धर्मशास्त्राची केंद्र बनलेली होती. हनफी फिकाह, नुसार मध्य आशियातील पंडितानी जे धर्मशास्त्राचे अर्थ लावले, तेच भारतात प्रचलित झाले आणि मुळात हनफी धर्मशास्त्र हे पोथी-निष्ठ आणि परंपरावादी होते. ११ व्या आणि १२ व्या शतकात अधिकृत मानला गेलेला बुरहानुद्दीन मर्गिनानी या परंपरावादी धर्मपंडिताचा प्रख्यात ग्रंथ " हिदाया" हा भारतातील इस्लामी धर्मशास्त्राचा आधार बनला. भारतातील सुन्नी पंथीयाचे लोक बहुसंख्य असल्याने येथील धर्मशास्त्राचे स्वरूप हे पोथी निष्ठ बनले.[२०] त्यामुळे हिंदुस्थानात देखील निरनिराळया राजघराण्याच्या काळात इस्लामी धर्म शास्त्राचे स्वरूप निरनिराळया प्रकारचे झालेले दिसून येते. मध्ययुगीन भारतात हिदाया प्रमाणेच शराए-अल-इस्लाम हा ग्रंथ तसेच फतवा आलमगिरी हा ग्रंथ, आणि दाइम अल् इस्लाम हा ग्रंथ मोठया प्रमाणात धर्मशास्त्राचे आधार म्हणून मानले गेले.[२१]

इस्लामी कायदयाचा उगम व विकास जाणून घेतल्यानंतर आपल्याला भारतातील मुस्लिम व्यक्तिगत कायदयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे, ते पुढील प्रकरणात करीत आहोत.

## संदर्भ टीपा

१. जोसेफ शाक्ट — अॅन इन्ट्रोडॅक्शन टू इस्लामिक लॉ. ओ. यु. पी. १९६५ पा. १

२. ए. ए. ए. फैजी — दि रिफार्म ऑफ मुस्लिम पर्सनल लॉ इन इंडिया, नचिकेत पब्लिकेशन १९७१, पान ५ ते ८

३. एफ. ए. क्लीन — द रिलिजन ऑफ इस्लाम कर्झन प्रेस लंडन - १९७१ ची नवी आवृत्ती पान ११७, ११८.

४. फैजी — पान २ ते ४

५. मुल्ला — संपादक सातवी आवृत्ती न्यायमुर्ती हिदायतुल्ला प्रिन्सीपल्स ऑफ मॉहेमेडन लॉ. त्रिपाठी पब्लिकेशन- १९७२, प्रस्तावना पान नं. २१ ते २८

६. मुल्ला — पान ३

७. जोसेफ शॉक्ट — पान ४, ५,

८. जोसेफ शॉक्ट — पान २५, २६

९. जोसेफ शॉक्ट — पान ४९

१०. मौलाना महंमद अली — द. रिलिजन ऑफ इस्लाम किताब भवन, १९७० पान, १०० ते १०३

११. मौलाना मंहमद अली पान ९७

१२. मौलाना मंहमद अली पान ९८

१३. असगर अली इंजिनिअर ऑकेजनल पेपर नं. २ भाग २
ऑगस्ट १९९३ तसरी प्रोसेस ऑफ
लॉ मेकिंग इन इस्लाम

१४. सय्यद अमीर अली दि. स्पिरिट ऑफ इस्लाम
क्रिस्तोफरर्स, लंडन, १९५३ पान, २२२-२२८

१५. अमीरअली २४३

१६. "पवित्र कुराण" क. ४:३

१७. मौलाना महंमद अली पान ६१३, ६१४.

१८. मौलाना मंहमद अली पान ६१५

१९. असगर अली इंजिनिअर " दि इस्लामिक स्टेट - विकास १९८०
पान ८०

२०. एम. मुबीब दि. इंडियन मुस्लीम, ॲलन ॲड अनविन
१९६९, पान ५८

२१. ए. ए. ए. फैजी पान-१२